**जिल्हा परिषद, वर्धा**
**कार्यालय : सामान्य प्रशासन विभाग,**
**सिव्हील लाईन, वर्धा**- 442001

**दुरध्वनी क्र.** 07152-243211/ 243889 **ई-मेल** :- dyceogenzpwardha@gmail.com

---

**क्र.जिपव/साप्रवि/आस्था**-1/**प्र.क्र.**08/2026 **वशि**- /2026 **दिनांक** :- **स्वाक्षरीखालील**

**अत्यंत महत्त्वाचे/ कालमर्यादेत :**

## परिपत्रक

## जिल्हा परिषद वर्ग-3 व वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या -2026

## सार्वत्रिक बदल्या सन-2026

**वाचा** :1)ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.122/आस्था-14,दिनांक 15 मे,2014
2) ग्राम विकास विभाग,शासन शुद्धीपत्रक क्रमांक: जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14 दि.02 जुलै,2014
3) ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-4816/प्र.क्र.136/आस्था-14, दि.02 जानेवारी,2017
4) ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 07 मार्च,2019
5) उप सचिव, महा.शा.ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.800/आस्था-7 दि.08 जानेवारी,2020
6) उप सचिव,महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग पत्र क्र.संकीर्ण2023/प्र.क.127/आस्था-14 दि.18 मे,2023
7) ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 28 मार्च,2025
8) ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-1125/प्र.क्र.125/आस्था-14, दि.23 मे,2025
9) ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:बैठक-4825/प्र.क्र.106/आस्था-14 दि. 09 सप्टेंबर,2025

जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या बाबत संदर्भिय शासन निर्णय क्रमांक (01) मधील प्रकरण 01 ते 05 नुसार सर्व समावेशक सर्वसाधारण बदल्यांचे धोरण, कार्यपद्धती व निकष निश्चित करण्यांत आली आहे. या निकषांनुसार जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबतची कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्त आहे. तसेच संदर्भिय शासन निर्णय दिनांक 15.05.2014 मधील नमुद बदल्यांच्या धोरणात शासनाकडुन वेळोवेळी संदर्भिय शासन पुरक पत्र/शुद्धीपत्रकान्वये सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत

त्यामध्ये सार्वत्रिक बदल्या करतांना पारदर्शकता असावी,कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये यादृष्टीने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1. प्रशासकीय बदल्यासाठी मुख्यालयातील एकूण कालावधी विचारात घेता त्यांच्या कालावधीनुसार वास्तव्य जेष्ठता यादी तयार करुन ती प्रसिध्द करावयाची असल्याने आपण तशी अचुक वास्तव्य सेवा जेष्ठता यादी तयार करुन बदलीकरीता पात्र कर्मचाऱ्यांची वैयक्तीक **पसंतीची तीन** (03) **ठिकाणे संबंधित कर्मचाऱ्याकडुन शासनाने विहित केलेल्या परिशिष्ट**-1 मध्ये लेखी स्वरुपात घेऊन त्यांच्या पसंतीच्या ठिकाणासह वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संवर्ग निहाय आपले कार्यालयात प्रसिध्द करावी. त्यावर हरकती असल्यास त्याचे निवारण आपले स्तरावर करावे. संवर्गनिहाय वास्तव्य जेष्ठता यादी विभाग प्रमुखांनी संबंधित खाते प्रमुखांकडे **दिनांक** 12 **एप्रिल,**2026 पूर्वी सादर करावी.

2. वरील प्रमाणे बदलीसंदर्भात शासनाचे धोरण विचारात घेऊन वास्तव्य सेवा जेष्ठता यादी आपले अधिनस्थ सूचना फलकावर संवर्गनिहाय प्रसिध्द करण्यात यावी व यादीची एक प्रत या कार्यालयास वर नमूद केलेल्या मुदतीत न चुकता सादर करावी. यादी सादर करतांना सर्व माहिती सेवापुस्तकावरुन तपासण्यात आली असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

3. सामान्य प्रशासन विभागास लिपीकवर्गीय सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक , विस्तार अधिकारी (सांख्यिकी), वाहन चालक व परिचर या संवर्गाची स्वतंत्र वास्तव्य सेवा जेष्ठता यादी पाठवावी. तसेच **बदलीपात्र/सुटपात्र विधवा,परितक्त्या/घटोस्फोटित महिला कर्मचारी/ '40' वर्षावरील वयाच्या अविवाहित महिला कर्मचारी** यांनी तसेच संदर्भाधीन क्रमांक (01) मधील दिनांक 15.05.2014 च्या शासन निर्णयात शासन निर्णय क्रमांक (04) दिनांक 07 मार्च,2019 नुसार अंतरभुत करण्यांत आलेल्या कर्मचाऱ्यांची कार्यालय प्रमुख यांचे मार्फतीने सुट बाबत अर्ज सादर करावे. **दुर्धर आजार असलेल्या कर्मचाऱ्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे, दिव्यांग कर्मचारी/मतिमंद मुलाचे पालक /दिव्यांग मुलाचे पालक यांनी शल्य चिकित्सक (त्रिसदस्य प्रमाणपत्र) व पडताळणी केलेले प्रमाणपत्र दिनाक 30 एप्रील,2026 पुर्वी सादर करावे**.

4. परिचर गट-ड (वर्ग-4) संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केलेला नाही तथापी ज्यांना विनंतीवरुन बदली करावयाची आहे अश्याच कर्मचाऱ्यांकडुन विनंती अर्ज **परिशिष्ट-1** मध्ये भरुन घ्यावे **तसेच शासन निर्णयातील प्रकरण-3 तालुकांतर्गत बदल्या बाबत विनंती अर्ज जिल्हा स्तरावर सादर करु नये केल्यास त्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. तालुकांतर्गत प्रशासकीय व विनंती बदल्या शासन निर्णयात नमुद टक्केवारीनुसार गट विकास अधिकारी यांनी आपले स्तरावरुन पाड पाडावीत व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा**.

5. ज्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णयातील तरतुदीनूसार सार्वत्रिक बदलीप्रक्रियेतून सुट घ्यावयाची आहे त्यांनी शासन निर्णयात नमुद नूसार पुरावे जोडुन (**परिशिष्ट-1 बदली अर्ज**) सोबत सलग्न करुन सादर करावे. **त्याचप्रमाणे वेगवेगळया जिल्हा स्तरावरील खाते प्रमुखांना त्या-त्या संवर्गाची स्वंतत्र संवर्गनिहाय माहिती सादर करावी**.

6. सर्व खाते प्रमुखांनी जिल्हा स्तरीय बदल्या करतांना बदल्यांचे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच संवर्गनिहाय वास्तव्य सेवा ज्येष्ठता याद्या जिल्हा परिषद, **वर्धा चे वेबसाईड** (www.zpwardha.in **तसेच** https://zpwardha.maharashtra.gov.in) वर देखिल प्रसिद्ध करण्यांत याव्यात.

## *जिल्हास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक*

| अ.क्र. | कार्यसूची | दिनांक |
|---|---|---|
| 1 | गट विकास अधिकाऱ्यांनी संवर्गनिहाय वास्तव्य जेष्ठता यादी जिल्हा परिषेदस सादर करणे. | 12 **एप्रिल**,2026 |
| 2 | जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवर्गनिहाय वास्तव्य जेष्ठता यादया संबंधित गट विकास अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या एकत्रित वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करुन प्रसिध्द करणे. | 17 **एप्रिल**,2026 |
| 3 | वास्तव्य सेवा जेष्ठता प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. **(कालावधी 10 दिवस)** | 18 **एप्रिल ते** 27 **एप्रिल**,2026 |
| 4 | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | 02 **मे**,2026 |
| 5 | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडणे. | 05 **ते** 15 **मे**,2026 |

## *तातुकास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक*

| | | |
|---|---|---|
| 1 | गट विकास अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या संवर्गनिहाय वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करुन प्रसिध्द करणे. | **12 एप्रिल,2026** |
| 2 | वास्तव्य सेवा जेष्ठता प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. (कालावधी 10 दिवस) | **13 एप्रिल ते 22 एप्रिल,2026** |
| 3 | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | **30 एप्रिल,2026** |
| 4 | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडणे. | **16 मे ते 25 मे,2026** |

सार्वत्रिक बदल्या करतांना त्यामध्ये पारदर्शकता असावी **या करिता संदर्भिय शासन निर्णयान्वये वरीलप्रमाणे धोरण निश्चित करुन दिलेले असल्याने शासन निर्णय व शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घेण्यांत यावी.** तसेच **संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक** 15.05.2014 **च्या शासन निर्णयातील "प्रकरण-2,जिल्हास्तरीय बदल्या" मधील अ.क्र.3 येथील तक्त्यामधील अ) प्रशासकीय बदली (1) व (2) हा मजकूर वगळण्यांत आला असुन संदर्भिय शासन शुद्धीपत्रक दिनांक 23 मे,2025 अन्वये समाविष्ट करण्यांत आलेल्या टक्केवारीनुसार (%) व इतर मजकूरानूसार प्रशासकीय बदली बाबत कार्यवाही करावी.**

**त्याचप्रमाणे जिल्हांतर्गत विनंती बदल्या मुद्दा क्र.3(ब) मधील (1) व (2) मध्ये नमूद टक्केवारीप्रमाणे व विहीत कालावधीत तसेच प्रकरण-3 मधील प्रशासकीय बदल्या इतर संवर्गाप्रमाणेच ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,आरोग्य कर्मचारी यांच्यादेखील बदल्या करणेबाबतची कार्यवाही निश्चित करण्यांत आली आहे. (प्रकरण-3 प्रशासकीय बदलीत सुधारणा संदर्भ क्रमांक (08) अन्वये)**

त्यानुसार आप-आपल्या संवर्गाची वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करुन सबंधित कर्मचाऱ्याचे निदर्शनांस आणून देऊन त्यांना पसंतीचे ठिकाण नमूद करण्यासंबंधी उपलब्ध करुन द्यावी. विनंतीकरीता कर्मचाऱ्यांचे अर्ज असल्यास शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार ते बदलीस पात्र ठरत असल्यास आपण आपल्या अभिप्रायासह सोबत जोडलेल्या विवरणपत्रात माहिती तयार करुन ती अचुक असल्याची खात्री करुन या कार्यालयास वर दिलेल्या मुदतीचे आत खास दुतामार्फत सादर करावे.

### विशेष सुचना :

**जिल्हा परिषद स्तरावरील शासनाने निश्चित करुन दिलेला बदल्यांचा कालावधी संपल्यानंतर विशिष्ट परिस्थितीमध्ये मा.विभागीय आयुक्तांचे पूर्व मान्यतेने बदल्या करण्यांत याव्यात असे शासनाचे निर्देश आहेत. त्या अनुषंगाने माझे असे निदर्शनास आले आहे की,सर्व विभागाकडील विशेष बाब बदलीची प्रकरण तसेच प्रतिनियुक्ती प्रकरणे इत्यादी बाबत अर्ज /नसत्या फार मोठया प्रमाणात वरिष्ठ कार्यालयास**

**सादर करणेकरीता प्राप्त होतात. त्यामुळे कर्मचारी यांचे चालु आर्थिक वर्षात विशिष्ट उदीष्ट कर्मचाऱ्यांना ठरवुन दिलेले असतांना त्यांच्या आस्थापनेमध्ये मध्यावधी बदल करणे उदीष्ट पुर्तीसाठी हानीकारक ठरते. त्याच प्रमाणे शिक्षक संवर्गाचे बदल्या शैक्षणिक सत्राच्या मध्ये करण्यांत आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. ज्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता साध्य करणे शक्य होत नाही.**

**सार्वत्रिक बदल्या सन-2026 चा शासन धोरणानुसार विहीत कालावधी जवळ असल्यामुळे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-2025 बाबत आदर्श आचारसंहिते संबंधित एकत्रित सुचना आदेश पारीत झाले असुन त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड मधील कर्मचारी यांचे इतरत्र कार्यालयात निवडणूक कामी नियुक्त करण्यांत आलेले आहे.**

**करीता वरील सर्व बाबींचा विचार करता खातेप्रमुख यांनी आपोआपल्या संवर्गातील कार्यरत कर्मचारी यांचे सार्वत्रिक बदल्या सन-2026 विनंती बदली अर्जाव्यतीरीक्त इतर मध्यावधी बदली बाबत विनंती अर्ज विभागाकडील प्राप्त प्रस्ताव (उदा. विशेष बदली प्रस्ताव /प्रतिनियुक्ती बाबत प्रस्ताव,इ. ) बदलीचा विहीत कालावधी (माहे -मे-2025) संपून 07 महिण्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मध्यावधी बदली बाबत विशेष बदली /प्रतिनियुक्ती इत्यादी संदर्भातील कोणत्याही संवर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करणेकरीता मान्यतेसाठी वारंवार सादर होणार नाही याची दक्षता खातेप्रमुख यांनी आपले स्तरावर घ्यावी.**

Signed by
Parag Suresh Soman
Date: 10-01-2026 16:15:55

**(पराग सोमण, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**<u>प्रतिलिपी</u>** :

1. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वर्धा.
2. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,वर्धा
3. ------------------------------------------------------------------- (खाते प्रमुख), जिल्हा परिषद, वर्धा.
4. **शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.तसेच ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-4817/प्र.क्र.7/आस्था-14,दिनांक 27 फेब्रुवारी,2017,दिनांक 07.04.2021 तसेच उप सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि.19.01.2022, कार्यासन अधिकारी,ग्रामा विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र दिनांक 02.12.2024, ग्राम विकास विभाग, शासन पूरक पत्र क्रमांक:जिपब-2023/प्र.क्र.118/आस्था-14 दिनांक 14 मे,2025, ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: जिपब -2023/प्र.क्र.118/आस्था-14 दिनांक 16 जून,2025 तसेच शासनाकडुन वेळोवेळी निर्गमीत झालेल्या सुचनेनुसार कार्यवाही करावी.**

5. गट विकास अधिकारी /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ------------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

6. बाल विकास प्रकल्प अधिकारी / एकात्मिक बाल विकास सेवा योजना, ------------------

7. उपअभियंता (बांधकाम/लघुपाटबंधारे/ग्रामिण पाणी पुरवठा/भुसविय) ----------------यांना माहिती व योग्य कार्यवाहीतस अग्रेषित.

8. तालुका वैद्यकिय अधिकारी / प्राथमिक आरोग्य केंद्र, ------------------

9. प्राचार्य जिल्हा परिषद महात्मा गांधी विद्यालय, वर्धा

10. मुख्याध्यापक जिल्हा परिषद कन्या शाळा,आर्वी ,वर्धा

**-स्वा/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,वर्धा**